मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रभाग आठ मध्ये माजी आमदार पुत्र आणि विद्यमान नगरसेवकांची प्रतिष्ठा पणाला

## भाजप-राष्ट्रवादीत थेट चौरंगी लढत! अपक्षांची बंडखोरी निर्णायक ठरणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक ८ (इंद्रायणी नगर, गवळी माथा, बालाजी नगर) येथील लढत अत्यंत प्रतिष्ठेची आणि लक्षवेधी ठरण्याची शक्यता आहे. कारण, या प्रभागात माजी आमदारांच्या पुत्राची आणि विद्यमान नगरसेवकाची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. चार जागांसाठी (अ-एस.सी., ब-ओबीसी महिला, क-खुला महिला, ड-खुला) भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP) यांच्यात थेट आणि अटीतटीची लढत पाहायला मिळणार आहे.




**‘अ’ अनुसूचित जाती (SC)**

प्रभाग ८ मधील अनुसूचित जाती (SC) साठी राखीव असलेल्या 'अ' गटातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून सीमाताई साबळे या प्रमुख दावेदार आहेत. त्यांना टक्कर देण्यासाठी भारतीय जनता पक्षाकडून (BJP) संदीपान झोंबाडे हे शर्यतीत आहेत. या दोघांव्यतिरिक्त महेंद्र सरोदे, गिरीश वाघमारे, अनिल सोदंडे, कल्पेश माने, पंकज पवार आणि अमोल डोळस यांसारखे अनेक महत्त्वाकांक्षी इच्छुक रिंगणात असल्याने शेवटच्या क्षणी उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी चुरस आहे.

**‘ब’ ओबीसी महिला:**

ओबीसी महिलांसाठी राखीव असलेल्या 'ब' गटात भाजपच्या नम्रता लोंढे यांचे पारडे जड आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तगडे आव्हान उभे करत राष्ट्रवादीकडून राजश्री गागरे, सोनाली उदावंत आणि कोमल साळुंके या प्रमुख महिला इच्छुक रिंगणात उतरण्यास सज्ज आहेत. येथे दोन्ही पक्षांमध्ये महिलांच्या माध्यमातून कडवी झुंज होणार हे निश्चित आहे.

**‘क’ खुला महिला:**

खुल्या महिला गटात भाजपच्या तीन महत्त्वाच्या महिला नेत्या नीलम लांडगे , इंद्रायणी काळकुटे आणि गीता महेंद्रु दावेदार आहेत. त्यांना आव्हान देण्यासाठी , पूजा सुरज लांडगे, आणि अश्विनी वाबळे या प्रमुख इच्छुक आहेत. विशेषतः पूजा सुरज लांडगे यांच्या माध्यमातून 'लांडगे' घराण्यातील महिला देखील खुल्या गटातून आपली ताकद दाखवणार आहेत.

**‘ड’ खुला गट:**

प्रभाग ८ मधील सर्वात निर्णायक आणि प्रतिष्ठेची लढत 'ड' खुल्या गटात पाहायला मिळणार आहे. येथे माजी आमदार पुत्र विक्रांत लांडे (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) आणि विद्यमान नगरसेवक मानले जाणारे विलास मडिगेरी (भारतीय जनता पक्ष) यांच्यात थेट सामना अपेक्षित आहे.विलास मडिगेरी हे विद्यमान नगरसेवक म्हणून त्यांच्या कामाच्या आधारावर पुन्हा संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. विक्रांत लांडे हे एका बड्या माजी आमदाराचे पुत्र असल्याने, ते युवा नेतृत्व आणि पक्षाच्या पाठबळावर ही जागा जिंकण्यास उत्सुक आहेत.

### बंडखोरीचे आव्हान:

- भाजपने संधी न दिल्यास निखिल काळकुटे अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. तसेच, तुषार सहाणे अपक्ष मधून आव्हान उभे करण्याची शक्यता आहे. याशिवाय राष्ट्रवादीचे संजय वाबळे हे देखील प्रबळ इच्छुक आहेत.
- अजहर खान हे देखील या गटातून शर्यतीत आहेत. हा खुला गट भाजप आणि राष्ट्रवादीसाठी केवळ जागा जिंकण्याची नाही, तर आपल्या नेतृत्वाचा प्रभाव सिद्ध करण्याचा एक रणसंग्राम बनला आहे. विक्रांत लांडे यांच्या माध्यमातून युवा नेतृत्वाची कसोटी लागणार असून विलास मडिगेरी यांच्या माध्यमातून अनुभवाची ताकद पणाला लागणार आहे.
- प्रभाग ८ मध्ये चारही जागांवर भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये थेट लढत निश्चित झाली असून, विविध गटांतील बंडखोर आणि अपक्ष उमेदवारही निवडणुकीत रंगत आणण्याची शक्यता आहे. या प्रतिष्ठेच्या लढतीत कोण बाजी मारणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.

---

# ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयाच्यावतीने रहाटणी परिसरात विशेष मोहीम

## सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या 153 जणांकडून 82 हजार 200 रुपयांचा दंड वसूल

**पिंपरी | प्रतिनीधी**

रहाटणी परिसरात ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयाच्यावतीने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याबाबत आरोग्य विभागाकडून एकूण १५३ जणांवर कारवाई करत ८२ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

आरोग्य विभागाकडून गल्लोगल्ली घंटागाडीची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे. मात्र काही नागरिक त्याकडे दुर्लक्ष करून स्वतःची जबाबदारी न ओळखता कचरा रस्त्यावर टाकत असल्याचे दिसून येत आहे. त्याची दखल घेत वरील मोहीम राबविली जात आहे. त्यात नागरिकांना रस्त्यावर कचरा न टाकण्याचे आवाहन करण्यात येत आहे. रस्त्यावर कचरा टाकताना आढळल्यास किंवा घाण, अस्वच्छता करताना दिसताच जागेवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

या मोहिमे अंतर्गत प्रभाग क्रमांक २७ येथील रहाटणी, श्रीनगर, रहाटणी फाटा, काळेवाडी फाटा, तांबे रोड इत्यादी परिसरात बेजबाबदार नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याबद्दल दंडात्मक कारवाई करण्यात आली.



महापालिकेचे ‘ग’ क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी कुंडलिक दरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक गणेश राजगे, आरोग्य मुकादम आबा कदम, अरुण राऊत, प्रदीप जगताप, सुधीर वायदंडे तसेच गणेश कार्ले, धोंडीबा भालेराव, सागर जाधव, भारत गायकवाड, अमरदीप जगताप, संतोष शेरखाने, पांडुरंग साठे, श्रीकांत कांबळे, विशाल यादव आणि यश लोंढे आदींच्या पथकाने ही कारवाई केली. ‘कचराकुंडी विरहित प्रभाग या संकल्पनेच्या माध्यमातून महापालिकेने नागरिकांनी कचरा फक्त घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन केले आहे.

> “आपले शहर व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी आपल्या महापालिकेच्या आरोग्य विभाग व कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी सर्वांची आहे. दंडात्मक कारवाईतून स्वच्छतेचा संदेश जावा ही अपेक्षा असून नागरिकांना त्रास देणे हा नाही. हे नागरिकांनी समजून घ्यावे.
>
> – गणेश बबन राजगे (आरोग्य निरीक्षक),
> प्रभाग क्र.२७, ‘ग’ क्षेत्रीय कार्यालय.

# खाद्यपदार्थ केंद्राचे 'सखी आंगण' असे मराठी नामकरण

## केंद्राचे संचालन पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांमार्फत करण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आकुर्डी येथे महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या खाद्य पदार्थ केंद्रातील ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटप करण्यासाठी भारतातील पहिला ई- लिलाव घेण्यात आला होता. या खाद्यपदार्थ केंद्राला 'सखी आंगण' हे मराठी नाव देण्यात आले तसेच या केंद्राच्या प्रतिकचिन्ह (लोगो) देखील निश्चित करण्यात आले. या केंद्राचे संचालन पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांमार्फत करण्यात येणार असून, महिलांच्या आर्थिक स्वावलंबन आणि सक्षमीकरणाच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.




महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात खाद्यपदार्थ विक्री केंद्राची उभारण्यात आले आहे. या आधुनिक इमारतीत एकूण ४९ गाळ्यांची व्यवस्था करण्यात आली असून, हे सर्व गाळे विविध महिला बचत गटांना खाद्य पदार्थ विक्री व व्यवसायासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या विक्री केंद्रातील गाळे महिला बचत गटांना भाडेकराराद्वारे देण्यासाठी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली देशातील पहिल्या गाळे ई-लिलावाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रति गाळा १५,१०० ते ३२,००० रुपयांपर्यंत लिलाव दर नोंदविण्यात आले. एकूण ४९ गाळ्यांपैकी २ गाळे दिव्यांग महिला बचत गटांसाठी, १ गाळा तृतीयपंथी गटासाठी, १ गाळा कोविड योद्धा महिला गटासाठी, २ गाळे आदिवासी गटांसाठी, ३ गाळे दीनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत गटांसाठी आणि उर्वरित ४० गाळे पीसीएमसी सक्षम अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी देण्यात आले.

सदर खाद्य पदार्थ केंद्राच्या सुशोभीकरण आणि ब्रँडिंगसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विशेष हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. डिझायनिंग आणि मार्केटिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून इमारतीचे आकर्षक सुशोभीकरण केले. या खाद्य पदार्थ केंद्राला 'सखी आंगण' हे मराठी नाव देण्यात आले आहे. या केंद्रात पिंपरी चिंचवड शहराच्या ऐतिहासिक वारशाचे दर्शन घडविणारे तसेच महिलांसाठी कार्य केलेल्या समाजसुधारकांची माहिती देणारे फलक लावण्यात आले आहेत.

> महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण करण्यासाठी 'सखी आंगण' हा उपक्रम मोठी भूमिका बजावणार आहे. महिला बचत गटांना व्यवसायाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कौशल्याला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न महापालिकेमार्फत करण्यात आला आहे. हा उपक्रम महिलांच्या विकासाच्या प्रवासात परिवर्तन घडवणारा ठरेल.
>
> **– श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> आकुर्डी येथील खाद्यपदार्थ केंद्राला 'सखी आंगण' हे मराठी नाव देण्यात आले आहे. या केंद्राद्वारे महिलांना खाद्यपदार्थ, हस्तकला, घरगुती वस्तू आणि वस्त्रनिर्मिती यांसारख्या विविध व्यवसायांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या उपक्रमातून महिलांना स्थिर उत्पन्नाचे व्यासपीठ मिळून शहराच्या अर्थचक्रात त्यांचा सहभाग वाढेल. दरमहा १० लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित असून, यामुळे महिलांचे कौशल्य, व्यवस्थापन क्षमता आणि आत्मविश्वास वाढण्यास निश्चितच हातभार लागेल. हा उपक्रम महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.
>
> **– ममता शिंदे, उपायुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# महानगरपालिकेच्या शाश्वत विकासकामांचा जागतिक पातळीवर सन्मान

## बार्सिलोना येथे झालेल्या 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड काँग्रेस 2025' मध्ये सहभाग

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख मजबूत केली आहे. स्पेनमधील बार्सिलोना येथे ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड काँग्रेस २०२५' दरम्यान आयोजित 'आंतरराष्ट्रीय शहरी आणि प्रादेशिक सहकार्य (IURC) ग्लोबल थीमॅटिक नेटवर्किंग कार्यशाळेत' सहभागी होण्यासाठी भारतातील सहा पायलट शहरांपैकी एक म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला आमंत्रित करण्यात आले होते.




सदर कार्यशाळेत मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि सहशहर अभियंता बापू गायकवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. शहरी गतिशीलता, हवामान बदलास अनुरूप नियोजन, आणि शाश्वत वाहतूक यांसारख्या विषयांवर केंद्रित सत्रांमध्ये त्यांनी जगभरातील शहर प्रतिनिधींशी अनुभव आणि कल्पनांची देवाणघेवाण केली.

या कार्यशाळेदरम्यान ल्यूवेन, हॅम्बुर्ग आणि व्हिक्टोरिया यांसारख्या शहरांसोबत 'वेस्ट-टू-एनर्जी', 'हरित वाहतूक प्रणाली' आणि 'स्मार्ट शहरी उपाय' या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चांमधून जगातील अनेक शहरे पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी नवोपक्रम आणि भागीदारीच्या माध्यमातून कसे प्रयत्नशील आहेत याची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

महानगरपालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवित आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून महानगरपालिका जागतिक पातळीवरील सर्वोत्तम शहरी धोरणे आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील हा सहभाग पिंपरी चिंचवड शहरासाठी एक मोठी उपलब्धी असून, महानगरपालिका जागतिक दर्जाच्या शाश्वत आणि स्मार्ट शहरांच्या यादीत स्वतःची ओळख अधिक दृढ करत आहे.

> बार्सिलोना येथे झालेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सहभाग म्हणजे आपल्या शहराच्या प्रगत आणि शाश्वत विकास दृष्टिकोनाची जागतिक स्तरावरची दखल आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, हरित वाहतूक आणि नागरिकाभिमुख धोरणांच्या माध्यमातून आम्ही जागतिक दर्जाचे, राहण्यायोग्य आणि भविष्याभिमुख शहर उभारण्याच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहोत.
>
> **– श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला या जागतिक परिषदेत स्थान मिळणे हे शहराच्या शाश्वत विकासाच्या प्रयत्नांची दखल आहे. या माध्यमातून आम्हाला विविध देशांतील शहरांचे यशस्वी अनुभव आणि नवीन तंत्रज्ञान जाणून घेण्याची संधी मिळाली, जी भविष्यातील प्रकल्पांसाठी उपयुक्त ठरेल.
>
> **– संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# आरक्षण सोडतीमुळे काही प्रभागात हाय होल्टेज निवडणूक होण्याची शक्यता...

## कोणत्या प्रभागातून कोण उभे राहणार हे आता जवळपास निश्चित होणार, तर काही ठिकाणी मुरब्बी माजी नगरसेवकांमध्ये हाय व्होल्टेज निवडणुक होणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी आज प्रारूप आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. या आरक्षण सोडतीनंतर अनेकांनी आनंदोत्सव साजरा केला असून पेढ्यांचेही वाटप करण्यात आले. तर दुसरीकडे अनेक दिग्गज माजी नगरसेवकांचे राजकीय गणित या आरक्षण सोडतीमुळे बिघणार असल्यामुळे ते तणावात आले आहेत. कोणत्या प्रभागातून कोण उभे राहणार हे आता जवळपास निश्चित होणार आहे. तर काही ठिकाणी मुरब्बी माजी नगरसेवकांमध्ये हाय व्होल्टेज निवडणुक होणार आहे.

महापालिकेत सातत्याने विविध विषयांवर आवाज उठवणारे डॉ. सिद्धार्थ धेंडे, सुनीता वाडेकर, सरस्वती शेंडगे, अविनाश बागवे, आबा बागुल, श्रीनाथ भीमाले, प्रवीण चोरबेले, मनिषा लडकत या माजी नगरसेवक तसेच माजी नगसविकांसाठी आरक्षण सोडतीच्या निश्चितीमुळे सर्वसाधारण गटातूनच निवडणुकीचा सामना करावा लागेल.

निवडणुकीत धोका वाढला आहे. त्यांना आरक्षणात बदल झाल्यामुळे वेगळा निर्णय घ्यावा लागणार आहे. तर पल्लवी जावळे, राहुल भंडारे यांचा पत्ता प्रभागरचना अंतिम झाल्या त्याच वेळी कट झाला होता. त्यामुळे त्यांना एकतर सर्वसाधारण प्रवर्गातून निवडणुक लढवावी लागेल किंवा पक्षातील उमेदवारांना पाठिंबा त्यांचा प्रचार करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

महापालिकेच्या येणाऱ्या जानेवारीतील निवडणुका चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीने घेतल्या जाणार असून, एकूण १६५ नगरसेवक निवडून येतील. यासाठी ४१ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत, ज्यात ४० प्रभाग चारसदस्यीय तर आंबेगाव-कात्रज हा एकमेव पाचसदस्यीय प्रभाग आहे. सर्व जागांपैकी निम्म्या म्हणजे ८३ जागा महिलांसाठी आरक्षित राहतील. याशिवाय अनुसूचित जातींसाठी २२, अनुसूचित जमातींसाठी २ आणि ओबीसींसाठी ४४ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

२०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीनंतर मुक्ता टिळक आणि मुरलीधर मोहोळ महापौर झाले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत टिळक या कसबा विधानसभा मतदार संघातून आमदार झाल्या. दुर्दैवाने दुर्धर आजाराने त्यांचे निधन झाले. तर मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोहोळ हे खासदार आणि केंद्रात मंत्री झाले. त्यामुळे मागील टर्मचे दोन्ही महापौर देखील सभागृहात दिसणार नाहीत.




### प्रभाग क्रमांक ४ मध्ये पुतण्या की भाचा

» वडगावशेरीतील खराडी- वाघोली प्रभाग क्रमांक ४ मध्ये अनुसूचित जाती (एससी) साठी सर्वसाधारण आरक्षण पडले आहे. त्यामुळे एससीमधून पुरुष उमेदवाराला संधी मिळणार आहे. सर्वसाधारण मधून पुरुष उमेदवाराला संधी मिळणार आहे. तर एक सर्वसाधारण महिला तर एक ओबीसी मधून महिला, असे आरोक्षण निश्चित झाले आहे. या प्रभागात एक एससीचा पुरुष तर एक सर्वसाधारण पुरुष आणि दोन महिला उमेदवार असतील. त्यामुळे वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांचा बालेकिल्ले असलेल्या प्रभागात पुतण्याला कि भाच्याला तिकीट देयचे, ही मोठी अडचण उभी राहिली आहे. नेमकी उमेदवारी कोणाला मिळणार यावरुन याप्रभागात चांगलीच चर्चा रंगली आहे. तर खराडी आणि वाघोली असे दोन भाग जोडल्यामुळे वाघोतील किती उमेदवार चारच्या पॅनेल मध्ये उभे असतील याकडेही लक्ष लागले आहे.

### हे नगरसेवक पदोन्नतीमुळे सभागृहात येणार नाहीत

» २०१७ नंतर दोन वेळा विधानसभा निवडणूक झाली. त्यावेळी नगरसेवक असलेले सिद्धार्थ शिरोळे, सुनील कांबळे, चेतन तुपे, हेमंत रासने हे देखील आमदार झाले आहेत. तर सुनील टिंगरे हे आमदार म्हणून पाच वर्षे कार्यकाळ पूर्ण केला. तर २०२४ ला पराभूत झाले. त्यामुळे ते नगरसेवक पदासाठी निवडणुक लढवण्याची शक्यता नाही. तर कसबा पोटनिवडणुकीत आमदार झालेले रविंद्र धंगेकर हे लोकसभा व विधानसभा निवडणूक लढले. परंतु दोन्ही वेळा त्यांचा पराभव झाला. त्यामुळे ते पुन्हा महापालिका निवडणूक लढवतील याची जवळपास शक्यता नाही.

# पुण्यातील 'बीडीपी'मधील अतिक्रमणांबाबत महापालिका प्रशासनाने उचलले मोठे पाऊल !

## महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने मार्केट यार्ड गंगाधाम परिसरामध्ये 'बीडीपी' भागात बेकायदा पद्धतीने उभारण्यात आलेल्या गोदामांवर कारवाई केली

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने मार्केट यार्ड गंगाधाम परिसरामध्ये 'बीडीपी' भागात बेकायदा पद्धतीने उभारण्यात आलेल्या गोदामांवर मंगळवारी कारवाई केली. या कारवाईत ही गोदामे, पत्राशेड पाडून टाकण्यात आले.

पर्वती विधानसभा मतदारसंघातील बिबवेवाडी येथील डोंगरमाथा डोंगरउतार (हिल टॉप- हिल स्लोप) येथे बेकायदा पद्धतीने मोठ्या प्रमाणात गोदामे आणि पत्राशेड उभारली आहेत. ही गोदामे व्यापाऱ्यांनी उभारली असून, तेथे माल उतरवण्यासाठी मोठे ट्रक, टेम्पो येतात. यामुळे या भागात सकाळी आणि संध्याकाळी वाहतूक कोंडी होते. या भागातील अनेक नागरिकांनी महापालिकेकडे तक्रारी करूनही वाढणाऱ्या बेकायदा गोदामांवर कारवाई झाली नाही.

गेल्या आठवड्यात महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या भागाची पाहणी केली. बेकायदा गोदामे, पत्राशेड बांधून करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे आदेश आयुक्त राम यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी बांधकाम विभागाकडून गंगाधाम येथील 'बीडीपी'च्या जागेत उभारण्यात आलेली गोदामे आणि पत्राशेडवर कारवाई केली.

महापालिकेच्या बांधकाम विभाग झोन-५ च्या वतीने ही कारवाई करण्यात आली. महापालिकेचे कर्मचारी आणि पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही कारवाई झाली. या कारवाईत सुमारे ६४ हजार २५० चौरसफूट बांधकाम पाडून जागा रिकामी करण्यात आली.




### नाना पेठेत बंदोबस्तात कारवाई

» नाना पेठेत आंदेकर टोळीने बेकायदा पद्धतीने केलेली अनधिकृत बांधकामे, जाहिरात फलकांवर महापालिका आणि पुणे पोलिसांनी यापूर्वीच कारवाई करून अनेक बेकायदा बांधकामे पाडून टाकली. मंगळवारी नाना पेठेत आंदेकर याच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या वारकरी भवनाचे बांधकाम अतिक्रमण विभागाने पाडून टाकले. यावेळी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई झाली.

# राष्ट्रवादीचा अभेद्य बालेकिल्ला कोणाकडे ?

## सलग 25 वर्षे राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला हा गट अपवादात्मक मागील काळात शिवसेनेने बाजी मारली होती.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील सर्वात मोठा नीरा – कोळविहीरे जिल्हा परिषद गट हा मागील (२०१७) प्रमाणेच नागरिकांचा मागासवर्ग महिला आरक्षित झाला आहे. सलग २५ वर्षे राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला हा गट अपवादात्मक मागील काळात (२०१७) शिवसेनेने बाजी मारली होती. हा बालेकिल्ला अभेद्य ठेवण्यासाठी राष्ट्रवादी पुन्हा प्रयत्नशील झाली आहे. यातच, शिवसेना शिंदे गट, भाजप, शरद पवार गट, शिवसेना उबाठा, आप, मनसे असे सात व काही अपक्ष उमेदवार रिंगणात उतरतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### राष्ट्रवादी पुन्हा ताकद लावणार?

» राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून चव्हाण कुटुंबातील महिलांच्या दाखल्याची जिंकून येणाऱ्या उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. तसेच उमेदवार सारीका सागर भुजबळ हे कोणत्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवायची यांची चाचपणी करीत आहेत. नीरा -कोळविहीरे जिल्हा परिषद गट हा मागील पंचवर्षीक निवडणुकीचा अपवाद वगळता पूर्वीपासून राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला आहे. तो पुन्हा ताब्यात मिळविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या जिल्हा परिषद गटात मोठी ताकद लावणार असल्याची चर्चा या जिल्हा परिषद गटातील आहे.

### इच्छुक महिला उमेदवारींची नावे चर्चेत

» नीरा – कोळविहीरे जिल्हा परिषद गटात ओबीसी महिला आरक्षण आले आहे. या गटातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून निरेच्या सरपंच तेजश्री विराज काकडे, निकिता योगेश ननवरे तर भाजपाकडून भाजपचे ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सचिन लंबाते यांच्या पत्नी, वाल्हे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सम्राज्ञी सचिन लिंबाते, माजी आमदार अशोक टेकवडे यांच्या सूनबाई सानिका अजिंक्य टेकवडे, सीमा संदीप धायगुडे, हेमा उमेश चव्हाण, राधाबाई माने, शिवसेनेकडून भारती अतुल म्हस्के, सुजाता वसंतराव दगडे, तेजश्वीनी गणेश गडदरे, ज्योती सागर भुजबळ हे संभाव्य उमेदवार आपले जातीचे दाखले मिळवून आपल्या पक्षांकडे उमेदवारीची मागणी करीत आहेत.

२०१७ साली पुरंदर तालुक्यात अत्यंत चुरशीच्या झालेल्या जिल्हा परिषदेच्या ४ गटांपैकी ३ ठिकाणी, तर पंचायत समितीच्या ८ पैकी ६ जागा जिंकून शिवसेनेने पुरंदर तालुक्यात एकतर्फी विजय मिळवला आहे. तत्कालीन भाजप, मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांना या ठिकाणी धक्का बसला होता. त्यावेळच्या अखंड राष्ट्रवादी काँग्रेसची अंतर्गत बंडाळी व गटबाजीचा फायदा शिवसेनेला व काही ठिकाणी काँग्रेसला झाला होता.

जिल्ह्यात लक्षवेधी ठरलेल्या नीरा -कोळविहीरे गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रा. दिगंबर दुर्गाडे, माजी आमदार अशोक टेकवडे, माजी जिल्हा परिषद सदस्य विराज काकडे, माजी सभापती बापू भोर, प्रदेश सदस्य कांचन निगडे, सोमेश्वरचे संचालक दिलीप थोपटे, सलग तीन पंचवार्षिक जिल्हा परिषद सदस्य व विविध विभागाचे सभापती पद असणारे नीरेचे चव्हाण परिवारातील सदस्यांसारखी दिग्गज नेते असताना शिवसेनेने बाजी मारली होती. या निवडणुकीत शिवसेनेच्या शालिनी पवार विजयी झाल्या होत्या. त्यांनी राष्ट्रवादीच्या तेजश्री विराज काकडे यांचा पराभव केला होता. एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिलेला या गटात यावेळी तरी उमेदवारी देताना पक्षाने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे

पुरंदर तालुक्यातील सर्वात मोठा नीरा – कोळविहीरे जिल्हा परिषद गट हा मागील (२०१७) प्रमाणेच नागरिकांचा मागासवर्ग महिला आरक्षित झाला आहे. सलग २५ वर्षे राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला हा गट अपवादात्मक मागील काळात (२०१७) शिवसेनेने बाजी मारली होती. हा बालेकिल्ला अभेद्य ठेवण्यासाठी राष्ट्रवादी पुन्हा प्रयत्नशील झाली आहे.

# मंचरमध्ये तीन प्रभागात समस्या कायम; रस्ते, पाणी आणि सुरक्षिततेसाठी मतदार प्रतिक्षेत

## विशेषत: रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि रात्रीच्या वेळी सुरक्षिततेचा अभाव या समस्या गंभीर बनल्या आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

मंचर नगरपंचायतीच्या पूर्वेकडील पुणे-नाशिक महामार्गाच्या पलीकडे वसलेले प्रभाग क्रमांक चार, पाच आणि सहा हे सध्या मोठ्या प्रमाणात विकसित होत असलेले परिसर मानले जातात. मात्र, या भागातील नागरिकांना अद्याप मूलभूत सोयीसुविधांच्या अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि रात्रीच्या वेळी सुरक्षिततेचा अभाव या समस्या गंभीर बनल्या आहेत.




### रस्त्यांची स्थिती देखील चिंताजनक

» अनेक सोसायट्यांमध्ये पाणीपुरवठा अपुरा असल्याने नागरिकांना वारंवार खाजगी टँकरच्या माध्यमातून पाणी खरेदी करून तहान भागवावी लागत आहे. या परिस्थितीमुळे सदनिकाधारक आणि सामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपंचायतीकडून पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात असले तरी लोकसंख्येच्या वाढीमुळे तो अपुरा पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या भागातील रस्त्यांची स्थिती देखील चिंताजनक आहे.

या परिस्थितीमुळे सदनिकाधारक आणि सामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपंचायतीकडून पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात असले तरी लोकसंख्येच्या वाढीमुळे तो अपुरा पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या भागातील रस्त्यांची स्थिती देखील चिंताजनक आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडून प्रवास कष्टदायक बनतो.

रात्रीच्या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे आणि बाभळीची झुडपे असल्याने अंधारात पादचारी आणि दुचाकीस्वारांना बिबट्या किंवा इतर प्राणिमात्रांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेसाठी पुरेशा प्रकाशव्यवस्थेची आणि झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याची मागणी केली आहे. या ठिकाणी सिमेंट रस्ते झालेले आहे.

तसेच काही ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा नियमित होत असला तरी पुरेसा नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. नगरपंचायतीने या भागात रस्ते, पाणी आणि प्रकाशव्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न सुरू केल्याचे सांगितले असले तरी नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष फायदा झालेला दिसत नाही. मंचरच्या या वेगाने वाढणाऱ्या प्रभागांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.